महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २२८ वे दिनांक : १३/०८/२०२६ वार : गुरूवार

## अभिजीत दीपके म्हणाले, जंतर-मंतर सीझन २ लवकरच येईल



**दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टी (CJP) चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी बुधवारी विद्यार्थी आंदोलनाच्या धर्तीवर आणखी एक आंदोलन लवकरच सुरू करण्याची घोषणा केली. त्यांनी याला 'जंतर-मंतर सीझन २' असे संबोधले. एका सार्वजनिक सभेत दीपके म्हणाले, इन्स्टाग्रामवर अनेक लोक विचारत होते की 'जंतर-मंतर सीझन २' कधी सुरू होईल. मी त्यांना सांगू इच्छितो की 'जंतर-मंतर सीझन २' खूप लवकर सुरू होणार आहे. CJP ने जंतर-मंतरवर ३७ दिवस धरणे आंदोलन केले होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आणि पक्षाच्या इतर प्रमुख मागण्या मान्य झाल्यानंतर २५ जुलै रोजी हे आंदोलन संपले होते. दीपके यांनी आरोप केला की, आम्ही आज दिल्लीत आमच्या स्वयंसेवकांची बैठक ठेवली होती. आम्ही एका हॉलच्या शोधात होतो, पण कोणीही आम्हाला हॉल भाड्याने द्यायला तयार नव्हते. सर्वजण म्हणत होते की, वरून दबाव आहे. त्यांनी दावा केला की, पक्षाने शेवटी एका हॉलची व्यवस्था केली होती. तथापि, त्यांचा आरोप आहे की, बैठकीच्या सकाळी हॉल मालकांना धमक्या देण्यात आल्या. दीपके यांनी आरोप केला, त्यांना सांगण्यात आले की, जर त्यांनी येथे CJP ची बैठक होऊ दिली, तर त्यांना उलटे लटकवले जाईल. दीपकेंनी धमक्यांमागे भाजपचा हात असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, अशा कारवाईमुळे पक्ष मागे हटणार नाही. ते म्हणाले, "हे सर्व भाजप करत आहे. त्यांची कामे आणि विधाने स्पष्टपणे दाखवतात की ते देशातील तरुणांना घाबरतात. जर त्यांना वाटत असेल की अशा छोट्या कृतींमुळे आम्ही घाबरू, तर ते खूप चुकीचा विचार करत आहेत." CJP चे मुख्य प्रवक्ते सौरव दास यांनी दीपकेच्या 'जंतर-मंतर सीझन २' या विधानावर म्हटले की, हा स्वतःच सीझन २ आहे. अशा अकार्यक्षम सरकारांविरुद्ध आणि अधिकाऱ्यांविरुद्ध देशभरात निदर्शने होत आहेत. दास म्हणाले की, CJP आता देशभरात 'लिसनिंग टूर' सुरू करणार आहे, जेणेकरून लोकांचे म्हणणे ऐकले जाईल. त्यांनी सांगितले की, पक्ष एक मोहीम राबवेल आणि स्वातंत्र्यदिनापासून शिक्षणाच्या मुद्द्याला प्राधान्य देईल.

## कॅश केसमध्ये हायकोर्ट जस्टिस वर्मांवर आरोप सिद्ध



**दिल्ली :** न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या २०२५ च्या रोख रकमेच्या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या संसदीय समितीने बुधवारी लोकसभेत अहवाल सादर केला. अहवालात न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील सर्व आरोप खरे ठरले आहेत. समितीच्या अहवालानुसार, १४ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायाधीशांच्या शासकीय निवासस्थानाच्या स्टोअररूममध्ये ५०० च्या नोटांनी भरलेली पोती सापडली होती, यातील बहुतेक नोटा जळलेल्या अवस्थेत होत्या. न्यायाधीश रोख रकमेच्या उपस्थितीबद्दल, त्याच्या स्रोताबद्दल आणि मालकी हक्कांबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. यासोबतच पुराव्यांची हाताळणी आणि सुरक्षितता राखण्यात गंभीर निष्काळजीपणा आढळला. चौकशी समितीला असे आढळले की न्यायमूर्ती वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानाच्या स्टोअर रूममध्ये ₹500 च्या नोटांचे बंडल आणि अर्धवट जळालेल्या नोटा मिळाल्या होत्या. अग्निशमन दल आणि पोलिसांच्या कर्मचाऱ्यांनी चौकशीदरम्यान सांगितले की नोटा फक्त एकाच ठिकाणी नव्हत्या, तर स्टोअर रूमच्या मोठ्या भागात पसरलेल्या होत्या. दिल्ली अग्निशमन दलाचे कर्मचारी अंकित सहगल यांनी सांगितले की त्यांनी ₹500 च्या नोटांचे बंडल पाहिले होते, जे स्टोअर रूममध्ये 7-8 फुटांपर्यंत पसरलेले होते.पोलिस अधिकारी रूपचंद यांना जेव्हा विचारण्यात आले की, रोख रकमेची रक्कम ₹५ लाखांपेक्षा जास्त होती का, तेव्हा त्यांनी सांगितले की, हा आकडा खूपच लहान आहे.मात्र, नोट जप्त करण्यात आल्या नाहीत, त्यांची मोजणी झाली नाही आणि नोटांचे नमुनेही सुरक्षित ठेवले नाहीत. याच कारणामुळे समिती हे निश्चित करू शकली नाही की, तिथे प्रत्यक्षात किती रोख रक्कम होती. आग विझल्यानंतर स्टोअर रूमला तात्काळ सील करण्यात आले नाही. सुरक्षा अधिकाऱ्याने न्यायमूर्ती वर्मा यांच्या कर्मचाऱ्यांना रात्री सुमारे ३ वाजता तिथे साफसफाई करताना पाहिले. सकाळपर्यंत जळालेले सामान बाहेर काढण्यात आले आणि खोली स्वच्छ करण्यात आली. तिथे सापडलेले नोटही सुरक्षित ठेवले नाहीत आणि नंतर ते सापडलेही नाहीत. समितीने असे मानले की, अशा प्रकारे महत्त्वाचे पुरावे सुरक्षित ठेवले नाहीत आणि त्यांच्याशी छेडछाड झाली. सुरुवातीला न्यायमूर्ती वर्मा म्हणाले की त्यांना रोख रकमेबद्दल कोणतीही माहिती नव्हती. नंतर बचावासाठी, रोख रक्कम बनावट होती, ती कट रचून ठेवली होती असे म्हटले. परंतु या दाव्यांच्या समर्थनार्थ कोणतीही एफआयआर, तक्रार किंवा ठोस पुरावा समोर आला नाही. न्यायमूर्ती वर्मा यांनी स्वतः साक्ष दिली नाही आणि त्यांच्या कुटुंबातील किंवा कर्मचाऱ्यांपैकी कोणालाही साक्षीदार म्हणून हजर केले नाही. समितीने न्यायमूर्ती वर्मा यांचे स्पष्टीकरण अपूर्ण, टाळाटाळ करणारे आणि परिणामी दिशाभूल करणारे मानले. ९ एप्रिल २०२६ रोजी न्यायमूर्ती वर्मा यांनी राजीनामा दिला होता. त्यांनी लिहिले होते की, मला हे पत्र लिहिण्याची जी कारणे आहेत, त्या कारणांमुळे मला तुमच्या सन्माननीय कार्यालयाला त्रास द्यायचा नाही. परंतु, अत्यंत दुःखाने मी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदावरून तात्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे. या पदावर सेवा करणे माझ्यासाठी सन्मानाची बाब होती.

## रोटरी तर्फे शाळेला टीव्ही संच भेट




**छत्रपती संभाजीनगर** :रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद एलिटच्या वतीने पाटील माध्यमिक विद्यालयासाठी ४३ इंची टी.व्ही. सेट तसेच संगणक/शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापनाला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शैलेन्द्र पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती माधुरी जोशी यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थितांमध्ये श्री. सतीश जोशी, श्री. अशोक देवरे तसेच रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमास स्वाती मॅडम, माधुरी सांगळेकर, अंजली मॅडम, श्री. प्रदीप जावदे, चौकोन सर, मनोरंजनी कदम मॅडम यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ज्येष्ठ शिक्षक डॉ. पी. एस. ढमाळे यांचीही विशेष उपस्थिती होती.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण घेण्यास मदत होणार असून, शाळेतील शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे. रोटरी क्लबने शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेल्या या सहकार्याचे उपस्थितांनी कौतुक केले. सूत्रसंचालन श्री. विलास कदम यांनी केले, तर आभार श्री. आर. पी. वल्ले यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ ऑगस्ट २०२६


## मुख्यमंत्र्यांनी राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल घेण्याची मुंबईत मागणी



**मुंबई (प्रतीनिधी):** शाश्वत कायदेशीर आणि घटनात्मक मराठा आरक्षणासाठी छत्रपती संभाजी नगर येथे सुरु असलेल्या डॉ राजेंद्र दाते दाते पाटील यांचे अन्न त्याग आमरण उपोषणाची तात्काळ दखल घेण्याची मुंबई करांनी मुख्यमंत्री आणि मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांचे कडे प्रत्यक्ष भेटुन केली आहे. निवेदनात असे नमुद केले कि,मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथे कायदेशीर आणि घटनात्मक मराठा आरक्षण मिळणे साठी सुरु असलेल्या जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे अन्न त्याग आमरण उपोषणास मुंबई करांचा पाठिंबा आम्ही जाहीर करीत आहोत.विविध संघटनांचा या अन्न त्याग आंदोलनास पाठिंबा असुन मागण्या मान्य होई पर्यंत माघार न घेण्याचा त्यांचा निर्धार मराठा समाजाच्या बाजुने असुन छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्तालया समोर सुरु असुन त्यांचा कोणासही कोणताही विरोध नसुन शासना विरुद्ध हे अन्न त्याग आंदोलन असुन हैदराबाद गॅझेटिअर प्रमाणे कुणबी जात प्रमाण पत्र कसे मिळेल याची शासनाने भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी असुन गॅझेटिअरच्यामराठा-कुणबी नोंद अथवा वंशावळ नसेल तर प्रमाण पत्र कसे देणार, तसेच ज्यांचे कडे काही एक पुरावा नाही त्या मराठा समाजाला कसे आरक्षण देणार? तसेच सारथी संस्थेला ५००० कोटी निधी,स्व आण्णासाहेब पाटील महामंडळ यांचे साठी व्याज परतावा करण्यासाठी व पुढील कर्ज प्रकरणे सुरळीत होण्यासाठी १०,००० कोटी निधी द्यावा,या मंडळाचे कार्यकारीसंचालक आकार्यक्षम असुन त्यांचे अडमुठे धोरणा मुळे कर्ज प्रकरणे थांबली आहेत म्हणुन त्यांची तात्काळ उचलबांगडी करावी.तसेच एसईबीसी प्रवर्गाला ओबीसी प्रमाणे शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शुल्क सवलत व शासकीय योजनांचा लाभ द्यावा, आंदोलनादरम्यान दाखल गुन्हे मागे घ्यावेत,प्रलंबित असलेल्या नियुक्ती बाबत उमेदवारांना तातडीने नियुक्त्या द्याव्यात तसेच कायगाव ता. गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे मराठा हुतात्मा स्मारक उभारावे, या मागण्याही त्यांनी केल्या असुन आमचा त्यास पाठिंबा आहे. शाश्वत आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चा च्या वतीने सुरु असलेल्या अन्न त्याग आंदोलन मुळे जर जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे जीवितास काही धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी शासनाची राहील याची कृपया नोंद घ्यावी नसता आम्हालाही मुंबईत आंदोलन सुरु करावे लागेल याची सुद्धा शासनाने नोंद घ्यावी अशी स्पष्ट भूमिका त्यांनी निवेदनात नमुद केली आहे.या प्रसंगी रामचंद्र शेडगे, अनिल सुर्वे, सदाशिव बानगुडे,संतोष शेजवळ, मारुती देसाई,पांडुरंग रोडे,राकेश वासुदेव,संतोष शेडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## रोटरी क्लब मुरूम सिटीला तीन मानाचे पुरस्कार



**मुरूम, ता. उमरगा येथील रोटरी क्लब मुरूम सिटीने मानाचा पुरस्कार स्वीकारताना सर्व रोटरीयन.**

**मुरूम (सुधीर पंचगल्ले)** : सामाजिक बांधिलकी जोपासत वर्षभर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय उपक्रम राबविणाऱ्या रोटरी क्लब ऑफ मुरूम सिटीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत वर्ष २०२५-२६ मध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत, क्लबला तब्बल तीन प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे.लातूर येथे पार पडलेल्या विशेष रोटरी पुरस्कार वितरण सोहळ्यात रोटरी क्लब मुरूम सिटीला ‘क्लब एक्सलन्स अवॉर्ड’, ‘डिजिसायटेशन अवॉर्ड’ आणि ‘बेस्ट अचिव्हमेंट इन पब्लिक इमेज’ या तीन मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.रोटरी क्लब मुरूम सिटीने केवळ उपक्रमांचे आयोजन न करता समाजातील तळागाळातील गरजू घटकांपर्यंत थेट मदत पोहोचविण्यावर भर दिला. यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि सायकलींचे वाटप, शालेय स्तरावर विविध स्पर्धा व उपक्रम. गरजू व विधवा महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई मशीनचे वाटप आणि महिलांच्या कलागुणांना हसरे व्यासपीठ, आरोग्यविषयक शिबिरे, डॉक्टरांचा विशेष सन्मान आणि व्यापक वृक्षारोपण मोहीम, ज्येष्ठ नागरिकांसोबत विविध सण साजरे करणे व सामाजिक जाणिवा जोपासणारे उपक्रम.लातूर येथील या दिमाखदार सोहळ्यास रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेश पटेल, माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातूरे, डॉ. दीपक पोकळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेले माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर, रोटरी पदाधिकारी व अनेक मान्यवर उपस्थित होते.माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी आणि सचिव कल्लाप्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली वर्षभर राबविण्यात आलेल्या लोकउपयोगी कामांचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. क्लबच्या वतीने अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे, सुनील राठोड, संतोष कांबळे, बाबासाहेब पाटील आणि डॉ. कमलाकर मोटे यांनी सन्मानचिन्ह स्वीकारले.या यशाबद्दल रोटरी क्लब मुरूम सिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ ऑगस्ट २०२६

# माझ्या आदिवासी पाड्यावर स्वातंत्र्य हवे आहे

तिरंगा माझाही आहे,
भारत माझाही आहे;
पण माझ्या झोपडीच्या दाराशी
स्वातंत्र्य अजूनही
वाट पाहत उभे आहे.

पंधरा ऑगस्ट येतो,
ध्वज आकाशात डोलतो;
माझ्या पाड्यावर मात्र
उपाशी पोटाचा प्रश्न
तसाच राहतो.

देश स्वतंत्र झाला,
म्हणतात सगळे अभिमानाने;
माझ्या आईची चूल मात्र
आजही विझते
रिकाम्या भांड्याने.

तुमच्या मुलांच्या हातात
महागड्या शाळेची बॅग,
माझ्या मुलाच्या हातात
आजही मजुरीची कुदळ
आणि फाटलेला दप्तराचा भाग.

तुम्ही म्हणता—
भारत चंद्रावर पोहोचला;
मी म्हणतो—
माझ्या पाड्यावरचा रस्ता
अजून गावापर्यंत का नाही पोहोचला?

तुमच्या शहरात
उंच इमारतींची रांग,
माझ्या झोपडीवर
पाऊस थेट करतो प्रहार.

तुम्ही धबधबे पाहता
विमानाच्या खिडकीतून,
माझी झोपडी वाहून जाते
पावसाच्या पाण्यातून.

तुमच्या ताटात
तुपाची धार,
माझ्या ताटात
भुकेचा अंधार.

तुम्हाला प्रश्न—
“आज काय घालू?”
माझ्या अंगावर
एकच फाटका कपडा;
तोही मी किती दिवस चालवू?

तुम्ही स्वातंत्र्याचा
उत्सव साजरा करता,
मी स्वातंत्र्याचा
अर्थ शोधत बसतो.

मला जगण्याची भ्रांत,
तुम्हाला महाल कुठे बांधायचा
हा प्रश्न!

मला दोन वेळच्या भाकरीची चिंता,
तुम्हाला संपत्ती कुठे ठेवायची
ही चिंता!

म्हणून म्हणतो—
देशाला स्वातंत्र्य मिळाले,
हे खरे आहे;
पण प्रत्येक माणसाला
सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य
अजून बाकी आहे.

ज्या दिवशी
शेवटच्या झोपडीत चूल पेटेल,
शेवटच्या मुलाच्या हातात पुस्तक येईल,
शेवटच्या माणसाला न्याय मिळेल,
शेवटच्या घरात दिवा लागेल—
त्या दिवशी मी म्हणेन,
होय! आता स्वातंत्र्य
माझ्या पाड्यावरही आले आहे.

तोपर्यंत माझा प्रश्न राहील—
तिरंगा फडकतोय आकाशात,
पण स्वातंत्र्य कुठे आहे
माझ्या माणसाच्या श्वासात?

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

# नाबार्डच्या माध्यमातून धाराशिवच्या विकासात योगदान देणारा वारकरी हरपला



**धाराशिव (प्रतीनीधी)** धाराशिव जिल्ह्याला लाभलेले नाबार्ड बँकेचे डीडीएम श्रीकांत भावे यांचे आज देहावसन झाले. देवाज्ञा झाली. त्यांच्या आठवणींना उजळा देणे हा माझा मी धर्म समजतो. सरांच्या पाच वर्षाच्या कार्यकालमध्ये महिला स्वयंसहाय्यता चळवळीची मुहूर्तमेढ रोवून कळसापर्यंत नेणारा एक सारथीश्री. श्रीकांत भावे यांच्या स्मृतींना अभिवादन करतो.काही माणसे आपल्या पदामुळे मोठी होत नाहीत; ती आपल्या कामामुळे, माणुसकीमुळे आणि समाजाच्या आयुष्यात घडवलेल्या बदलामुळे मोठी होतात. श्री. श्रीकांत भाभे हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. नाबार्डचे धाराशिव जिल्ह्याचे डीडीएम म्हणून त्यांनी ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, बचत गट आणि आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमातून समाजाच्या तळागाळात परिवर्तनाची बीजे रुजवली.आज ते आपल्यात नाहीत, ही जाणीव मनाला अस्वस्थ करते. पण त्यांच्या कार्याकडे पाहिले की जाणवते— माणूस जातो, परंतु त्याने उभे केलेले काम आणि त्यातून निर्माण झालेला आत्मविश्वास समाजात जिवंत राहतो.एक वारकरी, ज्याने विकासाची वारी केलीवारकरी म्हणजे केवळ पंढरपूरच्या वारीत चालणारा माणूस नव्हे. माझ्या दृष्टीने वारकरी म्हणजे समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याची निष्ठा असलेला माणूस.श्री. श्रीकांत भाभे हे अशाच अर्थाने विकासाचे वारकरी होते.नाबार्डच्या माध्यमातून त्यांनी धाराशिवच्या ग्रामीण भागातील प्रश्न समजून घेतले. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी महिला, शेतकरी आणि स्वयं-सहाय्यता समूह यांच्याशी जोडलेले काम त्यांनी पुढे नेले.त्यांच्या कामामध्ये केवळ कार्यालयीन कागदपत्रे नव्हती; त्यामागे गाव, महिला, कुटुंब आणि त्यांच्या भवितव्याचा विचार होता.महिला बचत गटांची मुहूर्तमेढमहिला स्वयंसहाय्यता समूह ही केवळ बचतीची व्यवस्था नाही. ती महिलांच्या आत्मविश्वासाची, आर्थिक स्वातंत्र्याची आणि सामाजिक नेतृत्वाची शाळा आहे.एकेकाळी ग्रामीण भागातील अनेक महिलांना स्वतःच्या नावाने आर्थिक निर्णय घेण्याची संधी नव्हती. बचत गटाच्या माध्यमातून त्यांनी बचत करायला शिकले, कर्ज घेण्याची प्रक्रिया समजून घेतली, छोट्या उद्योगांना सुरुवात केली आणि हळूहळू निर्णय प्रक्रियेत आपले स्थान निर्माण केले.या परिवर्तनाच्या प्रक्रियेला संस्थात्मक आधार देणाऱ्या व्यक्तींमध्ये श्री. श्रीकांत भाभे यांचे योगदान महत्त्वाचे होते.समाज विकास संस्थेच्या अगजप्पा महिला बचत गटाला नाबार्डचा राष्ट्रीय पुरस्कार मिळणे ही केवळ एका समूहाची कामगिरी नव्हती. त्या पुरस्कारामागे ग्रामीण महिलांच्या सामूहिक प्रयत्नांची, संस्थेच्या कामाची आणि त्यांना दिशा देणाऱ्या अनेक सहकाऱ्यांची मेहनत होती. भारत सरकारचे त्याकाळचे गृहमंत्री मा. पी. चिदंबरम यांच्या हस्ते या महिला बचत गटाचा राष्ट्रीय पुरस्काराने दिल्ली या ठिकाणी गौरव झाला, हा धाराशिवच्या ग्रामीण महिलांसाठी अभिमानाचा क्षण होता.त्या प्रवासात श्री. श्रीकांत भाभे यांचा सहभाग आणि मार्गदर्शन निश्चितच स्मरणात राहणारे आहे.पाणी आणि सामाजिक बदलधाराशिवसारख्या दुष्काळप्रवण भागामध्ये पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधनाचा प्रश्न नाही; तो अर्थव्यवस्था, स्थलांतर, शेती, महिला, कुटुंब आणि सामाजिक विकासाचा प्रश्न आहे.पाण्याचा प्रश्न सुटला तर शेतीला आधार मिळतो. शेतीला आधार मिळाला तर कुटुंबाला उत्पन्न मिळते. उत्पन्न वाढले तर स्थलांतर कमी होते. महिलांचा वेळ वाचतो. मुलांचे शिक्षण सुरू राहते. गावाची अर्थव्यवस्था मजबूत होते.म्हणूनच पाणी हा सामाजिक बदलाचा केंद्रबिंदू आहे.नाबार्डच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या विविध उपक्रमांना चालना देताना श्री. भाभे यांनी अशा व्यापक विकासदृष्टीला महत्त्व दिले. पाणी, शेती, महिला बचत गट आणि ग्रामीण अर्थव्यवस्था हे वेगवेगळे विषय नसून एकमेकांशी जोडलेले आहेत, ही जाणीव त्यांच्या कार्यातून दिसून येत होती.सारथीची भूमिका,सारथी स्वतः रथाच्या पुढे धावत नाही; तो रथाला योग्य दिशा देतो.श्री. श्रीकांत भाभे यांनी अनेक ग्रामीण उपक्रमांमध्ये अशीच सारथीची भूमिका निभावली.संस्था काम करते, महिला बचत गट काम करतात, गावकरी प्रयत्न करतात; पण त्यांना योग्य शासकीय यंत्रणेशी जोडणे, योजना समजावून देणे, बँकिंग व्यवस्था आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे ही भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.त्यांनी ही भूमिका केवळ अधिकारी म्हणून नव्हे, तर समाजाच्या विकासाबद्दल आस्था असलेल्या सहकाऱ्याप्रमाणे निभावली.आठवणीचे एक पानआज त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणींकडे पाहताना अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात.कार्यालयातील अधिकारी म्हणून नव्हे, तर ग्रामीण भागातील माणसाच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणारा एक सहकारी म्हणून त्यांची आठवण येते.त्यांच्या जाण्याने एक व्यक्ती कमी झाली असे म्हणणे अपुरे ठरेल. ग्रामीण विकासाच्या वाटेवर चालणारा एक सहप्रवासी, महिलांच्या आत्मनिर्भरतेवर विश्वास ठेवणारा एक मार्गदर्शक आणि सामाजिक परिवर्तनाला आर्थिक विकासाशी जोडणारा एक सारथी आपण गमावला आहे.परंतु त्यांच्या कामातून उभे राहिलेले महिला बचत गट, आत्मनिर्भर झालेल्या महिला, ग्रामीण भागातील विकासाची प्रक्रिया आणि सामाजिक संस्थांना मिळालेली दिशा हीच त्यांच्या कार्याची खरी स्मृती आहे.**माणूस जातो; विचार राहतात.पद संपते; पण कार्याची परंपरा पुढे जाते.आणि शरीर नश्वर असले तरी समाजासाठी केलेले काम अमर राहते.श्री. श्रीकांत भाभे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.धाराशिवच्या विकासाच्या वाटेवर त्यांनी पेटवलेली ज्योत पुढे नेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ ऑगस्ट २०२६


## माजी सैनिक हवालदार आयुबशा आमीरशा मदार यांना भावपूर्ण श्रध्दांजली

**छ. संभाजीनगर :** काल आडगाव भोसले येथील माजी सैनिक.. हवालदार. आयुबशा आमीरशा मदार हे त्यांच्या दुचाकीवर जात असतांना रोड अपघातात गंभीर जख्मी झाले होते. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे उपचार चालू असतात आज सकाळी त्याचा मृत्यू झाला... ..त्यांचाअंतिमविदाई आज आडगांव येथे करण्यात आला...

त्यांवेळी मयत झालेल्या सैनिकास सैनिकी सन्मानात आजी माजी सैनिक संघटना आडगांव पिशोर व समस्त गावकरी मंडळी यांचे कडुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करण्यात आली....

त्यावेळी आजी माजी सैनिक, गावातील मंडळी, पाहुणे मंडळी, असे असंख्य लोक अखेरची निरोप म्हणून श्रद्धांजली देण्यासाठी उपस्थित होते..त्यांनी १९९५ पासुन २०१९ पर्यंत २४ वर्षे सिग्नल कोर , सैन्यात सेवा करुन सेवानिवृत्त झाले होते... त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**जय हिंद, जय भारत, जय जवान, जय किसान**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# रासायनिक खतांचे जीवमात्रावर होणारे दूरगामी परिणाम

**धाराशिव (प्रतीनीधी)** शेती ही भारतीय संस्कृतीची जीवनवाहिनी आहे. माती, पाणी, बी-बियाणे, पशुधन आणि शेतकरी यांच्या परस्पर सहजीवनातून अन्ननिर्मितीची प्रक्रिया हजारो वर्षे सुरू आहे. मात्र आधुनिक शेतीमध्ये उत्पादन वाढविण्याच्या स्पर्धेत रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वाढता वापर झाला. सुरुवातीला त्याचे परिणाम उत्पादनवाढीच्या रूपाने दिसले; परंतु आज त्याची किंमत माती, पाणी, जैवविविधता, प्राणी आणि मानवी आरोग्याला मोजावी लागत आहे.रासायनिक खत म्हणजे केवळ पिकाला दिलेले पोषण नाही. त्याचा अतिरेकी आणि असंतुलित वापर हा संपूर्ण पर्यावरणीय साखळीवर परिणाम करणारा घटक ठरू शकत आहे.मातीचा जीव हरवत चालला आहेमाती ही निर्जीव धूळ नसून असंख्य सूक्ष्मजीव, गांडुळे, बुरशी आणि इतर जीवांनी बनलेली एक जिवंत परिसंस्था आहे. सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीव आणि नैसर्गिक पोषणचक्र यामुळे माती सुपीक राहते.रासायनिक खतांचा सतत आणि गरजेपेक्षा जास्त वापर केल्यास मातीतील नैसर्गिक संतुलन बिघडू शकते. सेंद्रिय पदार्थ कमी होणे, मातीची रचना खराब होणे, आम्लता किंवा क्षारता वाढणे आणि सूक्ष्मजीवांच्या विविधतेवर परिणाम होणे अशी समस्या निर्माण होऊ शकते.आज प्रश्न फक्त “एकरी किती उत्पादन मिळाले?” हा नसून “पुढील पिढीसाठी आपली माती किती जिवंत ठेवली?” हा असला पाहिजे.पाण्याचे प्रदूषणशेतात दिलेले खत पूर्णपणे पिकाद्वारे शोषले जात नाही. नायट्रोजन आणि फॉस्फरससारखी पोषकद्रव्ये पावसाच्या पाण्यासोबत वाहून गेली किंवा जमिनीत झिरपली तर भूजल आणि पृष्ठभागावरील जलस्त्रोतांवर परिणाम होऊ शकतो.जलस्त्रोतांमध्ये पोषकद्रव्यांचे प्रमाण वाढल्यास शेवाळाची अतिवाढ, पाण्यातील ऑक्सिजनची कमतरता आणि जलचर परिसंस्थेचे नुकसान होऊ शकते.म्हणून शेतातील अतिरिक्त खत शेवटी नदी, तलाव आणि विहिरीपर्यंत पोहोचते, हे विसरून चालणार नाही.मानवी आरोग्यावर परिणामअन्नसाखळीमध्ये माती आणि पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. खतांचा अतिरेकी वापर, दूषित पाणी आणि चुकीच्या कृषी पद्धती यामुळे मानवी आरोग्यावर अप्रत्यक्ष परिणाम होऊ आहे.विशेषतः नायट्रेटचे भूजलातील वाढलेले प्रमाण सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. त्यामुळे खतांचा वापर हा केवळ कृषी उत्पादनाचा प्रश्न नसून अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे.जैवविविधतेवर संकटशेतीच्या शिवारात फक्त पीक नसते. तेथे गांडुळे, मधमाश्या, फुलपाखरे, पक्षी, बेडूक, सूक्ष्मजीव आणि असंख्य जीवांचे अस्तित्व असते.असंतुलित कृषी रसायनांचा वापर या जैवविविधतेवर दबाव निर्माण करू शकतो. परागीभवन करणारे कीटक कमी झाले तर त्याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावरही होऊ शकतो.निसर्गातील प्रत्येक जीवाचे एक कार्य आहे. एखाद्या एका घटकाचे नुकसान झाले तर त्याची साखळी प्रतिक्रिया संपूर्ण परिसंस्थेवर होऊ शकते.हवामान बदलाशी संबंधनायट्रोजनयुक्त खतांच्या वापरातून नायट्रस ऑक्साइडसारख्या हरितगृह वायूंचे उत्सर्जन होऊ शकते. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या हवामानावरील परिणामांकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.आज हवामान बदलामुळे पाऊस अनियमित झाला आहे, तापमान वाढत आहे आणि दुष्काळ-पुराचे चक्र अधिक अस्थिर होत आहे. अशा परिस्थितीत शेतीने निसर्गाशी संघर्ष करण्याऐवजी निसर्गासोबत काम करण्याची गरज आहे.उत्पादनवाढ की शाश्वत शेती?रासायनिक खतांचा पूर्णपणे निषेध करणे हा या समस्येचा एकमेव उपाय नाही. पिकाच्या गरजेनुसार, माती परीक्षणाच्या आधारावर आणि योग्य प्रमाणात खतांचा वापर करणे महत्त्वाचे आहे.त्याचबरोबर—शेणखत आणि कंपोस्टचा वापरहिरवळीची खतेजैवखतेपीक फेरपालटमिश्रपीक पद्धतीआच्छादन पद्धतीमाती परीक्षणसेंद्रिय कर्ब वाढविणेस्थानिक जैवविविधतेचे संवर्धनपाण्याचा कार्यक्षम वापरया उपायांचा अवलंब केला पाहिजे.शेतकऱ्याला दोष देऊ नका; पर्याय द्यारासायनिक खतांचा वापर वाढला म्हणून केवळ शेतकऱ्याला दोष देणे योग्य नाही. उत्पादनाचा दबाव, बाजारपेठ, वाढती मजुरी, हवामानातील अनिश्चितता आणि तातडीच्या उत्पन्नाची गरज यामुळे शेतकरी अनेकदा उपलब्ध साधनांचा वापर करतो.म्हणून शेतकऱ्याला दोष देण्यापेक्षा माती वाचवणाऱ्या, खर्च कमी करणाऱ्या आणि उत्पादन टिकवून ठेवणाऱ्या पर्यायी शेती पद्धती उपलब्ध करून देणे ही शासन, कृषी विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.पुढच्या पिढीसाठी प्रश्नआपण आज जमिनीला जे देतो, ते उद्या अन्नाच्या रूपाने आपल्या ताटात परत येते. आपण पाण्यात जे सोडतो, तेच पाणी पुढील पिढी पिणार आहे. आपण मातीतील जीवसृष्टी नष्ट केली तर भविष्यातील शेती कोण करणार?म्हणून शेतीचा विकास म्हणजे केवळ उत्पादन वाढवणे नव्हे; मातीचे आरोग्य, पाण्याची शुद्धता, जैवविविधता आणि मानवी आरोग्य यांचे संरक्षण करणे हाच खरा कृषी विकास आहे.आज गरज आहे ती “जास्त खत जास्त उत्पादन” या मानसिकतेतून बाहेर पडण्याची.माती जिवंत असेल तर शेती जिवंत राहील.शेती जिवंत असेल तर शेतकरी जिवंत राहील.आणि शेतकरी जिवंत असेल तरच समाजाचे भविष्य सुरक्षित राहील. चला तर माती टिकऊया शेती पिकऊया सेंद्रिय शेतीचा जास्तीत जास्त वापर आपल्या शेतामध्ये करूया


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ ऑगस्ट २०२६


## बिल्डा शाळा समिती अध्यक्षपदी बोरसे; उपाध्यक्षपदी शाह



**फुलंब्री (प्रतीनीधी) :** तालुक्यातील बिल्डा जिल्हा शाळा व्यवस्थापन समितीची नवीन कार्यकारिणी घोषित झाली असून, अध्यक्षपदी नानासाहेब पंढरीनाथ बोर्से, तर उपाध्यक्षपदी सरताज अरख शाह यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या प्रसंगी सरपंच सोमनाथ मते, सुदामराव मते, उपसरपंच एजाज शाह, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर मते, प्रवीण जाधव, रामदास कणसे, गजानन चव्हाण, रामदास मुळे, जनार्दन पगडे, मुख्याध्यापक एन. डी. क्षीरसागर, शिक्षिका एस. एस. अजमे, दादाराव पेटारे, आकाश पाटील गायकवाड, सलीम शाह, ज्योती खंडागळे, रेणुका राऊत, हर्षद चव्हाण, संतोष कांबळे, ओंकार गायकवाड आदी उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांचे उपस्थितांनी तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवादिन साजरा

**उमरगा (नागसेन कांबळे) :** गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सभागृहात आज राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवादिन आणि परिसर स्वच्छता पंधरवडा अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले.यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते प्रा. नागसेन कांबळे, अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुलाब राठोड प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ. बालाजी कोनाळे, प्रा. डॉ. आशिया चिशती, ग्रंथपाल डॉ. बापूसाहेब काळदाते उपस्थित होते. प्रा. नागसेन कांबळे यांनी "संयुक्त राष्ट्राने 17 डिसेंबर 1999 साली हा आंतरराष्ट्रीय युवा दिन जाहीर केला आणि 2000 पासून तो आजपर्यंत अव्यहातपणे साजरा केला जातो ,या पाठीमागील भूमिका आणि संकल्पना स्पष्ट केली व तसेच हा राष्ट्रीय युवादिन म्हणून हा दिवस भारतात स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिवशी म्हणजेच 12 जानेवारीला साजरा केला जातो. युवकांमध्ये जग बदलण्याची ताकद असून तेजस्विता ,तपस्विता व तत्परता हे गुण ज्यांच्या अंगी आहेत त्या कुणालाही आपल्याला युवक संबोधता येते .तरुणांच्या समस्या कडे लक्ष देण्यासाठी व समाजात त्यांचे योगदान वाढविण्यासाठी, जाणीव जागृती आणि अनुभव समृद्ध करण्यासाठी या अशा आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन दरवर्षी केले जाते. त्यामुळे राष्ट्र बलवान करण्यासाठी आणि राष्ट्राचे भवितव्य उज्वल करण्यासाठी युवकांचे भवितव्य उज्वल असणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन करून विद्यार्थ्यांनी व युवकांनी इतर गोष्टींकडे लक्ष न देता आपल्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल करून एक परिपक्व नागरिक आणि एक सुसंस्कृत माणूस म्हणून राष्ट्राप्रति आपली वर्तणूक निश्चित केली पाहिजे असे सांगितले.

प्रारंभी प्रमुख उपस्थितांतर्फे संत गाडगे बाबा आणि डॉ. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. बालाजी कोनाळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत स्वच्छता पंधरवडा विषयी सविस्तर विवेचन केले.

त्यानंतर ग्रंथपाल डॉ. अनिल ऊर्फ बापूसाहेब काळदाते यांनी डॉ.एस. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी चालवलेल्या ग्रंथालयीन चळवळीचा आढावा घेत डॉ.एस.रंगनाथन यांच्या पंचसूत्रीची माहिती दिली.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जाणीव जागृत करून आपले ध्येय निश्चित करत असताना आपले अग्रक्रम ठरविणे गरजेचे आहे असे सांगत आज युवक सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे असे सांगितले.युवकांनी यावजलोश,युवा स्फांदन , युवक महोत्सव आणि युवक नेतृत्व शिबिरात आवर्जून सहभाग नोंदवला पाहिजे असा आग्रह धरून वेचक का असेना पण वाचल पाहिजे आणि आपल्या समृद्ध ग्रंथालयाचा पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहन करून अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाचे देखणे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंभुसे यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ .भाऊसाहेब उगले यांनी उपस्थित सर्वांचे मनस्वी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## जालन्यात जेईएस महाविद्यालयात संत गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**जालना : (राजेंद्र सोनवणे)** जेईएस महाविद्यालय जालना येथे शेगावचे श्री.संत गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन झाल्यावर उत्साहात, चैतन्यमय वातावरणात स्वागत करण्यात आले .

यावेळी जालना एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री. श्रीनिवासजी भक्कड प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री विठ्ठल क्षेत्र, पंढरपूर येथून परतीच्या प्रवासात श्री संत गजानन महाराज यांची दिंडी व पालखीचे दि. १० ऑगस्ट २०२६, सोमवार रोजी सकाळी११ वाजता भक्तिमय वातावरणात, टाळ - मृदुंगाच्या गजरात, रामकृष्ण हरी च्या नामस्मरण तसेच जगद्गुरु तुकोबारायांच्या अभंग गात ५०० वारकऱ्यांना समावेत श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे उत्साहात जेईएस महाविद्यालय जालना येथे आगमन झाले. जालना शहरातील भक्तांच्या दर्शनासाठी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पालखीचा मुक्काम होता. जालना एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन समिती तसेच प्राचार्य व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थीनी पालखीतील व दिंडीतील वारकऱ्यांचे पुष्प उधळून स्वागत केले.

सायंकाळी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे जालना शहरातील नागरिकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होती जवळपास ३० ते ४० हजार भाविकांनी दर्शन घेतल्याचे सांगण्यात आले.

## किनगाव राजात श्रींच्या पालखीचे उत्साहात आगमन



**किनगाव राजा (महेश मुंढे)** - महेश मुंढेश्रींच्या पालखीचे किनगाव राजा नगरीत मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पालखीच्या स्वागतासाठी नागरिक, भाविक व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'माऊली माऊली'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.पालखी सोहळ्यानिमित्त भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन माऊली डिस्पोजल इंडस्ट्रीचे प्रोप्रायटर विशाल अरविंद जाधव यांच्या तर्फे भक्तांसाठी पिण्याच्या थंड व स्वच्छ पाण्याचे वाटप करण्यात आले. पालखी सोहळ्यातील मोठी गर्दी पाहता पाण्याची ही सेवा भाविकांसाठी मोठा दिलासा ठरली.भाविकांच्या सेवेसाठी पुढाकार घेत माऊली डिस्पोजल इंडस्ट्रीने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाचे उपस्थित नागरिक व वारकरी भाविकांकडून कौतुक करण्यात आले. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने केवळ व्यवसायापुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रमातून नागरिकांच्या सेवेत सहभागी होण्याची भूमिका संस्थेने अधोरेखित केली.यावेळी पालखी सोहळ्याचा आनंद घेत असतानाच भाविकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने वारकरी व नागरिकांनी विशाल अरविंद जाधव व माऊली डिस्पोजल इंडस्ट्रीचे आभार मानले."भाविकांची सेवा हीच माऊलीची सेवा" या भावनेतून करण्यात आलेला हा उपक्रम किनगाव राजा परिसरात चर्चेचा विषय ठरला




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ ऑगस्ट २०२६


## विचार - मंथन कृतज्ञता म्हणजे स्वर्ग

माणूस मृत्यूनंतर स्वर्ग मिळेल या आशेने आयुष्यभर खूप प्रयत्न करत असतो. कोणी उपवास करतात, कोणी दानधर्म करतात, कोणी तीर्थयात्रा करतात, तर काहीजण देवाला नवस बोलतात. स्वर्ग म्हणजे एखाद्या नवीन हाऊसिंग सोसायटीसारखा आहे, जिथे एक छोटा फ्लॅट मिळवण्यासाठी पुण्याचे गुण जमा करावे लागतात असं वाटतं...पण एक क्षण थांबून असाही विचार करा...काय माहित... आपण आधीच स्वर्गातच जगत असू?सकाळी उठल्याबरोबर आजूबाजूला एकदा लक्ष द्या.एक बटण दाबलं की अंधार प्रकाशात बदलतो.दुसरं बटण दाबलं की पंखा फिरायला लागतो.तिसरं बटण दाबलं की थंड हवा खोलीभर भरते.नळ उघडला की पाणी वाहू लागतं.गॅस पेटवला की काही मिनिटांतच जेवण तयार होतं.खिशातून मोबाईल काढला की संपूर्ण जग तुमच्या हाताच्या तळव्यावर येतं.हजारो किलोमीटर दूर असलेली तुमची प्रिय माणसं काही क्षणांतच तुमच्या डोळ्यासमोर दिसतात.इतक्या सगळ्या अद्भुत सोयी... पण आपण यांना खूप सामान्य समजतो. या सगळ्या आपल्या जन्मसिद्ध हक्क आहेत असं वागतो.एकदा कल्पना करा...दोनशे वर्षांपूर्वीचा एखादा राजा आज तुमच्या घरी आला, तर कदाचित तो त्याच्या राजवाड्यात परतही जाऊ इच्छिणार नाही.तो आश्चर्याने विचारेल —"हे काय?" — गरम पाणी!"मग हे काय?" — थंड हवा!"हे काय आहे?" — संपूर्ण जगाची माहिती!"हे?" — दहा मिनिटांत घरी येणारं जेवण!तेव्हा तो हसून म्हणेल —"मी आयुष्यभर राज्य केलं, युद्धं जिंकली, अफाट संपत्ती मिळवली... पण अशा सोयी मला कधीच मिळाल्या नाहीत."हे खरंच आहे!आज एक सामान्य माणूसही अनेक सोयींच्या बाबतीत जुन्या काळातील सर्वात शक्तिशाली राजांपेक्षाही जास्त श्रीमंत आहे.तरीही...आपण आनंदी नाही.का?कारण माणसाला जे मिळालं आहे त्याची किंमत हळूहळू कमी होते.एसी चालू आहे — आनंद नाही. बंद झाला कीच त्रास जाणवतो.मोबाईल आहे — आनंद नाही. नेटवर्क गेलं की जग संपल्यासारखं वाटतं.स्वतःचं घर आहे — समाधान नाही. शेजारच्याचं घर मोठं आहे याचं दुःख.स्वतःची गाडी आहे — तृप्ती नाही. दुसऱ्याची गाडी मोठी आहे याची चिंता.म्हणजे माणूस त्याच्या स्वतःच्या स्वर्गात उभा राहून, दुसऱ्याच्या स्वर्गाशी स्वतःची तुलना करून दुःखी होतो.पण याच पृथ्वीवर अजून एक जगही आहे...आजही लाखो लोक एका माठभर पाण्यासाठी तासन्तास रांगेत उभे असतात.लाखो कुटुंबांकडे पक्कं घरच नाही.दिवसातून दोन वेळचं जेवणही नक्की नाही. मुलांची स्वप्नं शाळेच्या उंबरठ्या वर पोहोचण्या आधीच तुटतात. अंग झाकायला नीट कपडे देखील नाहीत.आपण "सामान्य" समजतो त्या सोयीच दुसऱ्यांसाठी आयुष्याचं मोठं स्वप्न आहेत.आपल्याला एसीचा रिमोट सापडला नाही की राग येतो.त्यांना उन्हापासून वाचायला झाडाची सावलीही मिळत नाही.आपण डाएट चार्ट शोधतो.ते पुढच्या वेळचं जेवण कसं मिळेल याचा विचार करत झोपतात.तेव्हा समजतं...स्वर्ग आणि नरक म्हणजे मृत्यूनंतर मिळणाऱ्या जागा नाहीत...ते इथेच आहेत... या पृथ्वीवरच... याच शहरात... याच रस्त्यावर... कधी कधी एकाच भिंतीच्या दोन बाजूंना...एका घराचा मुलगा त्याचा नवीन मोबाईल थोडा स्लो झाला म्हणून कंटाळतो.समोरच्या घराचा मुलगा ऑनलाईन शिकायला मोबाईलच नाही म्हणून रडतो.एक माणूस गरम पाणी पाच मिनिटं उशिरा आलं म्हणून तक्रार करतो.दुसरा माणूस आज पाणी मिळालं तरी पुरे आहे म्हणून देवाला प्रार्थना करतो.फरक परिस्थितीतच नाही... फरक दृष्टिकोनातही आहे.काही लोक वाईट परिस्थितीतही हसायला शिकले आहेत.तर काही लोक सगळ्या सोयी असूनही तक्रारीतून बाहेर पडू शकत नाहीत.माणसाची सर्वात विचित्र सवय म्हणजे — त्याच्याकडे जे नाहीये त्याचा हिशोब तो रोज करतो...पण त्याच्याकडे जे आहे त्याचा हिशोब तो कधीच करत नाही.प्रत्येक रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाच गोष्टी लिहून बघा —आज मी श्वास घेतोय.आज माझ्याकडे प्यायला पाणी आहे.आज मला जेवण मिळालं.आज मला रहायला एक घर आहे.आज माझी माणसं माझ्यासोबत आहेत.कदाचित आपलं आयुष्यच बदलून जाईल.कदाचित "स्वर्ग" म्हणजे एक जागा नाही... तो एक अनुभव आहे!तसंच "नरक"ही एक जागा नाही... तो अनुभव विसरून जाणं म्हणजेच नरक!आपल्याकडे जे आहे त्याबद्दल कृतज्ञ असणं म्हणजे स्वर्ग.जे मिळालं आहे ते विसरून, तक्रारीतच जगणं म्हणजे नरक.मृत्यूनंतर काय होतं हे कोणालाच खात्रीने माहीत नाही.पण जगत असतानाच आपल्याला ही सुंदर पृथ्वी, श्वास घ्यायला हवा, प्यायला पाणी, खायला अन्न, प्रेम करणारी आपली माणसं, एक बटण दाबल्यावर मिळणाऱ्या असंख्य सोयी मिळाल्या आहेत.इतकं सगळं असूनही जर आपण नेहमीच दुःखात असू...तर त्यापेक्षा मोठं दुर्दैव कोणतं?कदाचित देव हसून म्हणत असेल —"मी तुला स्वर्गातच ठेवलं आहे... पण तू तिथेही तक्रारींचं ऑफिसच उघडलं आहेस!"म्हणून आजपासून तक्रारी मोजू नका..."कृतज्ञता" मोजा.कारण "कृतज्ञता" असलेल्या हृदयातच खरा स्वर्ग असतो.~

**प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे.**
**जालना.**

## ग्रंथालयातील AI वापरावर कार्यशाळा संपन्न



**पाटोदा, (प्रतिनिधी)** : भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत ज.भ.शि.प्र. मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी 'ग्रंथालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए.आय.) वापर : आव्हाने आणि संधी' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा महाविद्यालयात संपन्न झाली. या प्रसंगी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. 'ग्रंथालयात (ए.आय.) वापर: आव्हाने आणि संधी' या एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे उदघाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढीचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळे च्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख पाहुणे म्हणून व्हि. एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथपाल, प्रा. चारुशीला कुलकर्णी (बाहेगव्हाणकर) ह्या उपस्थित होत्या तर प्रा. सोमनाथ घाडगे आणि अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. कार्यशाळेच्या उद्घाटना प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी ग्रंथालयीन क्षेत्रात AI वाढता वापर, त्याचे महत्त्व आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची आवश्यकता या बाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ज्योती रकटे, ग्रंथपाल, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांनी केले. त्यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करताना आधुनिक काळात ग्रंथालयीन सेवा अधिक प्रभावी व गतिमान करण्यासाठी AI भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या प्रा. चारुशीला कुलकर्णी (बाहेगव्हाणकर), ग्रंथपाल, व्हि. एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी 'ग्रंथालयातील ए.आय.चा वापर : संधी आणि व्यावहारिक उपयोग' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रंथालयातील विविध कामकाजात AI चा उपयोग, माहितीचे संकलन व शोध, वाचकांना तत्पर सेवा देणे तसेच ए. आय. च्या विविध साधनांचा व्यावहारिक वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. ए.आय. तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयीन क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या नव्या संधींसोबतच त्याच्या वापरातील आव्हाने आणि जबाबदाऱ्यां वरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना त्याचा विवेकपूर्ण आणि जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. ग्रंथालये ही ज्ञानाची केंद्रे असून ए.आय. मुळे त्यांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणता येतील, असे त्यांनी नमूद केले.यावेळी प्रा. सोमनाथ घाडगे, यांनी आपले मत व्यक्त केले. त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनाचे कौतुक करत ए. आय. विषयक मार्गदर्शन विद्यार्थ्यांसह शिक्षक व ग्रंथालय क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणारे असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. बंडू लोखंडे यांनी प्रभावीपणे केले. कार्यशाळेच्या शेवटी बी. ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. यशोदा चक्रपाणी जाधव हिने आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजना साठी महाविद्यालय प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

**उमरगा, (प्रतिनीधी)** : वाचन संस्कृती रुजविणे, विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाविषयी आस्था निर्माण करणे आणि ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्याच्या उद्देशाने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतातील ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी ग्रंथालय दिन साजरा केला जातो.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देवरकर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासात ग्रंथालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांचा वाचनाकडे कल कमी होत असल्याची खंत व्यक्त करून, विद्यार्थ्यांनी नियमितपणे ग्रंथालयाचा वापर करावा आणि वाचनाच्या माध्यमातून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.ग्रंथपाल दिनानिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दुर्मिळ व संदर्भीय ग्रंथांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात चार वेद, महाभारत, रामायण, भारतीय साहित्यकोश, जागतिक ज्ञानकोश, मराठी विश्वकोश, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, इंग्रजी अनुवादित भगवद्गीता, ऐतिहासिक ग्रंथ, मराठी व इंग्रजी व्याकरणाची पुस्तके तसेच विविध संदर्भग्रंथ मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास ग्रंथालय सल्लागार समितीचे चेअरमन प्रा. डॉ. चंद्रसेन करे यांच्यासह समितीचे सदस्य, प्राध्यापक-प्राध्यापिका, ग्रंथपाल डॉ. प्रतिभा गायकवाड, सहाय्यक ग्रंथपाल श्री. एस. एस. जगताप, ग्रंथालयीन कर्मचारी बी. आर. साठे, व्ही. पी. मोरे, बी. एफ. औरादे, भगवान काळे, जीवन उपासे, प्रकाश सुंटनेरे, करिअर कट्टा विद्यार्थी पदाधिकारी, स्पर्धा परीक्षा वर्गातील विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.